अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड शुक्रवार
१४.०८.२०२६
# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: १९५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेसच्या वैमानिकांना अमली पदार्थ चाचणी सक्तीची

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**नवी दिल्ली** – एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसमधील सर्व वैमानिकांची अमली पदार्थांच्या सेवनाबद्दलची चाचणी घेण्यात येणार आहे. टाटा समूहाच्या मालकीच्या या दोन्ही विमान कंपन्यांमध्ये मिळून ५,००० हून अधिक वैमानिक आहेत. गेल्या आठवड्यात फुकेत–दिल्ली विमान अचानक ३०० फूट खाली येण्याच्या घटनेनंतरच्या चौकशीत संबंधित वैमानिकाने गांजा घेतल्याचे निष्पन्न झाले होते. त्या पार्श्वभूमीवर ही चाचणी केली जाणार आहे. दोन्ही कंपन्यांनी वैमानिकांना याबाबत संदेश पाठवला आहे. ही चाचणी अनिवार्य असून गुरुवारपासूनच सुरू करण्यात येणार आहे, असे सूत्रांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तारीख पे तारीख!

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंनी नवी कारणांसह नवी डेडलाईन सांगितलीश

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**मुंबई** – कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कर्जमाफीच्या संदर्भात एक मोठं वक्तव्य केलंय. 'पुढील दोन ते चार दिवसात पाच ते दहा हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी कर्जमाफीची सध्या जोरदार प्रक्रिया सुरू आहे. अशातच या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जात आहे. मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा न झाल्याने बळीराजा परीक्षेत असल्याचे चित्र आहे. अशातच आता राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कर्जमाफीच्या संदर्भात एक मोठं वक्तव्य केलंय. 'पुढील दोन ते चार दिवसात पाच ते दहा हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, अशी माहिती त्यांनी दिली आहे. ते वाशिम इथे बोलत होते.

द र म्य ा न, अँग्रीस्टॅगच्या माध्यमातून कर्जमाफीच्या याद्या पडताळण्याचं काम प्रगती पथावर आहे. आता शासनाकडे पैसे उपलब्ध आहेत. त्यामुळे जशी यादी अद्यावत होईल तसतसे खात्यात पैसे जमा होतील. कर्जमाफीमुळे ४० हजार ५८५ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांना लाभ होईल. अशी माहिती कृषिमंत्री तथा वाशिमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशीम इथ दिलीये.

शहरी भागातील शेतकऱ्यांनाही सिंचन विहीर आणि इतर योजनांचा लाभ देण्यासाठी तरतूद करू शहरी भागातील शेतकऱ्यांना सिंचन विहीर आणि इतर योजनांचा लाभ मिळत नसल्याचं पत्रकारांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर. मला या संदर्भात कल्पना नसल्याची कबुली देत लवकरच शहरी भागातील शेतकऱ्यांनाही सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी तरतूद करू, असं आश्वासन भरणे यांनी वाशिम मध्ये पत्रकारांशी बोलताना दिलय.

## जमिनीचे दावे वर्षानुवर्षे अडकलेत?

# आता मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत जमिनीचे दावे निकाली निघणार : राज्य सरकारचा मेगा प्लॅन

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**मुंबई** – महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे.

महसूल विभागाच्या न्यायालयात अनेक वर्षांपासून धूळ खात पडलेले जमिनींचे महसुली दावे आणि वाद जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्य सरकारने 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या मोहिमेचा विशेष 'मेगा प्लॅन' तयार केला आहे.

१ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान विशेष मोहीम क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून हे विशेष अभियान राबवले जाणार आहे. हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सात महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात राबवले जाईल. या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांनी 'महसूल लोक अदालत' भरवण्यात येणार आहे. यामुळे प्रलंबित प्रकरणे टप्प्याटप्प्याने आणि जलद गतीने सोडवण्यावर भर दिला जाणार आहे. या विशेष मोहिमेत खालील सर्व स्तरांवरील प्रलंबित महसुली दावे निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मंडळ अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी या तिन्ही स्तरांवरील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या जमिनींच्या नोंदी, सीमांचे वाद, हक्कांचे दावे आणि इतर महसुली प्रकरणांवर त्वरित सुनावणी घेऊन निकाल दिला जाईल. सर्वसामान्यांना कसा होणार फायदा? अनेकदा जमिनीच्या छोट्या–छोट्या वादांमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांना वर्षांनुवर्षे सरकारी कार्यालयांचे आणि न्यायालयांचे खेटे मारावे लागतात.

# शाळांमधील शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग सुकर

## शासनाकडून पदभरतीस मान्यता

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*



**मुंबई** – शालेय शिक्षण विभागातील हजारो रिक्त जागांच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रलंबित पदभरतीस शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे शिक्षकांवरील कामाचा भार हलका होणार आहे.

शि क्ष के त र कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे शाळांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. या पदभरतीला हिरवा कंदील मिळाल्याने शाळांना मोठा दिलासा मिळणार आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांना यामुळे रोजगाराची नवीन संधी उपलब्ध झाली असून, ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाईल, असे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

या मान्यतेनुसार कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पदांची सरळसेवेने भरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. रिक्त पदे भरताना सर्वप्रथम शाळेतील पात्र चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली जाईल. त्यानंतर अनुकंपा नियुक्तीच्या प्रक्रियेचा अवलंब केला जाईल. या दोन्ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही पदे शिल्लक राहिल्यास, संचमान्यतेनुसार एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के पदांवर सरळसेवेने भरती केली जाईल. भरती प्रक्रियेसाठी बिंदुनामावली मागासवर्ग कक्षाकडून तपासून घेणे बंधनकारक असेल. उमेदवारांना अर्ज करण्यासाठी किमान ३ महिन्यांचा अवधी दिला जाईल. खुला प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे असणार असून, निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा सुरुवातीचा ३ वर्षांचा कालावधी मानधनावरील असेल.

# देशातील पोलीस, अग्निशमन दल आणि नागरी संरक्षण आणि सुधारात्मक सेवांच्या १०५७ जणांना पदके जाहीर

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*




**नवी दिल्ली**– भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे औचित्य साधून देशातील पो–लीस, अग्निशमन, गृहरक्षक, नागरी संरक्षण आणि सुधारात्मक सेवा दलाच्या एकूण १०५७ जणांना पदके जाहीर झाली आहेत. काहींना शौर्य पदके तर अनेकांना सेवा पदके जाहीर झाली आहेत. शौर्य पदक (जीएम) हे जीवित आणि मालमत्तेचे रक्षण करताना, किंवा गुन्हा रोखताना किंवा गुन्हेगारांना अटक करताना दाखवलेले उल्लेखनीय धैर्य, यासाठी प्रदान केले जाते. यंदा एकूण ३०१ शौर्य पदके (जीएम) जाहीर झाली आहेत. यात २७२ पोलिसांना आणि २९ अग्निशमन दलाच्या जवानांना जाहीर झाली आहेत. यंदाच्या ३०१ शौर्य पुरस्कारांपैकी सर्वाधिक, १९७ नक्षलग्रस्त भागातील जवानांना, तर जम्मू आणि काश्मीर क्षेत्रातील ५१ जवान, ईशान्येकडील राज्यांमधील १२ आणि इतर भागातील ४१ जवानांना त्यांच्या शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल प्रदान केले जात आहेत. राष्ट्रपतींचे अती विशिष्ट सेवा पदक हे सेवेतील विशेष उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाते, आणि गुणवत्तापूर्ण सेवा पदक हे साधनसंपन्नता आणि कर्तव्यनिष्ठेने केलेल्या मौल्यवान सेवेसाठी प्रदान केले जाते. यंदा एकूण ९२ राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके (पीएसएम) जाहीर झाली असून यात पोलीस सेवेतील ८३, अग्निशमन सेवेतील चार, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक सेवेतील तीन आणि सुधारात्मक सेवेतील दोन जणांचा समावेश आहे.

# मेट्रोसारखी लोकलची भेट : २०२७ पासून २३८ आधुनिक लोकल सेवेत

## एसी, स्वयंचलित दरवाजांची लोकल धावणार

## मार्च २०३० पर्यंत मुंबईची लोकलसेवा होणार मेट्रोसदृश

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*




**मुंबई** – केंद्र सरकारने उपनगरीय रेल्वे लोकलची मेट्रोच्या धर्तीवर निर्मिती करण्यास मान्यता दिली आहे. यामुळे स्वयंचलित दरवाजे, वातानुकूलित आणि स्वच्छ अशा मेट्रोसारख्या लोकल ट्रेनची निर्मिती होणार आहे.

२०२७ पासून २०३० पर्यंत मेट्रोसारख्या २३८ उपनगरीय लोकल ट्रेन मुंबईकरांच्या सेवेत दाखल होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दोन पायाभूत सुविधांचे ई–लोकार्पण, ठाणे ते बोरिवली दुहेरी भुयारी मार्गाच्या प्रकल्पातील ठाणे बाजूकडील टीबीएम अर्जुनाचा शुभारंभ आणि वांद्रे–कुर्ला संकुलाच्या जी ब्लॉकला पूर्व द्रूतगती मार्गासोबत जोडणाऱ्या उड्डाणपूलाला माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले उड्डाणपूल नामकरणाचा कार्यक्रम सह्याद्री अतिथीगृह येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडला.



# शिवछत्रपती क्रीडा प्रबोधनी व न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांना आर्चरी स्पर्धेत सुवर्णपदक



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक शिवछत्रपती क्रीडा प्रबोधनी व न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट वरुडच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक बिदर येथे ४ ते ९ ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या सीबीएससी साऊथ झोन आर्चरी स्पर्धेमध्ये गोल्ड मेटल प्राप्त केले आहे. १४ वर्षातील कंपाउंड बो प्रकारामध्ये शार्विल प्रफुल होले, श्रीराज प्रवीण हुड, जय रामविजय झुमडे यांनी गोल्ड मेटल तर १४ वर्षातील कंपाऊंड प्रकारामध्ये मुलींमध्ये अनुश्री हरेश सायनेरे, यादवी मंगेश यावले व आराध्या आशिष श्रीराव या विद्यार्थीनींनी गोल्ड मेटल प्राप्त केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांची हरियाणा पाणीपत येथे होणाऱ्या नॅशनल सीबीएससी आर्चरी चॅम्पियनशिप करीता निवड झाली असून विद्यार्थ्यांच्या यशामागे प्रशिक्षक यशपाल दवंडे, सहकारी अभिजीत मेंढे, एनआयएस कोच संजय दवंडे तसेच सर्व विद्यार्थ्यांचे पालक यांचा सिंहाचा मोठा वाटा असून पुढील वाटचाली करीत न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट संचालक मंडळ डॉ.राम गोधने, सुधाकर ठाकरे, अनिल गुल्हाने, गोपाल वानखेडे, डॉ.वेदांत राजोरिया, विनय यावलकर, प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, किशोर देशमुख, पराग भोंडे, रोशन यावले व वैभव शिरभाते व सर्व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यात आरोपीला जामीन

## ॲड.अंकिता जैस्वाल यांची न्यायालयात यशस्वी युक्तिवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – बी.एन.एस.कलम ६४ (२) (एम), ६५ (१), ८७, १३७ (२) तसेच पोक्सो कलम ४ व ६ अंतर्गत दाखल गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपी राहुल यास न्यायालयाने जामीन मंजूर केला.

सदर प्रकरणात आरोपी राहुलच्या वतीने विधी सेवा प्राधिकरण तर्फे ॲड.अंकिता जैस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली. ॲड.अंकिता जैस्वाल यांनी प्रभावीपणे बाजु मांडत यशस्वी युक्तिवाद केला. आरोपीविरुद्ध करण्यात आलेले आरोप, उपलब्ध कागदपत्रे, पुराव्यांचे स्वरूप तसेच जामिना संदर्भातील विविध कायदेशीर बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देण्यात आल्या.

ॲड.अंकिता जैस्वाल यांनी मांडलेल्या प्रभावी कायदेशीर मुद्द्यांचा विचार करून न्यायालयाने आरोपी राहुल यास जामीन मंजूर केला.गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात कायदेशीर बाबींचा सखोल अभ्यास करुन प्रभावीपणे युक्तिवाद करत आरोपीस जामीन मिळवून देण्यात ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या यशस्वी युक्तिवादाचे विशेष महत्त्व राहिले. प्रकरणातील आरोपीच्या बाजूने जामीन मिळाल्याने ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या कायदेशीर कार्याची पुन्हा एकदा प्रभावी नोंद झाली आहे.

# एसटीच्या स्मार्टकार्डला उत्स्फूर्त प्रतिसाद; १ कोटीहून अधिक प्रवाशांची नोंदणी, ६४ लाखांहून अधिक कार्ड सक्रिय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांचा प्रवास सुलभ करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्टकार्डला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आजपर्यंत राज्यात तब्बल १ कोटी १ लाख ७३ हजार ८३८ प्रवाशांनी या कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी ६४ लाख ९१ हजार ६५ कार्डे सक्रिय झाली आहेत.




एनसीएमसी स्मार्टकार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ आणि कॅशलेस करण्याच्या दिशेने महामंडळाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पहिल्या टप्प्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एनसीएमसी स्मार्टकार्डचे वाटप करण्यात येत आहे. येत्या १ सप्टेंबरपासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्टकार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर एनसीएमसी स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. प्रवाशांना एनसीएमसी स्मार्टकार्ड अधिकृत एसटी आगार, बसस्थानक तसेच अधिकृत एजंट नेटवर्कच्या माध्यमातून मिळविता येणार आहे.

१५ ऑगस्टपासून विद्यार्थ्यांना एनसीएमसी कार्डचे वाटप येत्या १५ ऑगस्टपासून राज्यभरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी स्मार्टकार्डच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

जरुड कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने

# रासेयो च्या सहभागाने 'हर घर तिरंगा घर घर तिरंगा' अभियान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने 'हर घर तिरंगा घर घर तिरंगा' अभियाना अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये जनजागृती करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केले.




विविध घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस, डॉ.विनायक भटकर, डॉ.राम कुलसंगे, डॉ.विष्णु पडवाल, डॉ.रविकांत महिंदकर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शशिकांत काळे, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, डॉ.पुजा महाले, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लीलाधर चौधरी, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रेणुका वानखडे, प्रा.सीमा कानडे, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.रुपाली सवई, प्रा.श्वेता लोखंडे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, निलेश बंदे, संतोष चव्हाण, अनिल हरले, दुर्गा हरले, रासेयो स्वयंसेवक चेतन आखरे, प्रज्वल बोळाखे, संजीवनी पवार, कांचन शिंदे, गायत्री भंडारे, शिवम निंभोरकर, हर्षल मधापुरे, भावेश कुबडे, नीराज वानखडे, निखिल भोयर, नितीन उईके, भूषण युवनाते, कार्तिक गोरे, तौफिक शहा तौफिक कलीम, कृणाल चव्हाण, पवन धुर्वे, यशवंत कुसराम, नेहा कांडलकर, कनिष्का घोरपडे, स्नेहल कडू, दिशा मोहने, भूमिका कडू, वैष्णवी जवारे, पवन सातपुते, यश कुमार बारस्कर, मुस्कान अहमद, प्रणव शेटे, महेश नागले, झाकीरिया कुरेशी, जियान खान, अबीर खान, अब्दुल शेख, आदम खान, आयन खान, योगेश कुरवाडे, चैतन्य रावेर, अक्षय बहुरूपी, चंदन देशमुख, हिमेश घोडिले, रोहित वासनकर, कुणाल बालबन्सी, ओम चोरे, पार्थ उघडे इत्यादी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य संग्रामात हुतात्मे पावलेल्या शहिदांना रविवारी बेनोड्यात मान्यवरांच्या उपस्थितीत श्रध्दांजली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – बेनोडा (शहीद) येथील १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात हुतात्मे पावलेल्या अमर पूज्य शहिदांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १६ ऑगस्ट रोजी तालुक्यातील बेनोडा (शहीद) येथे श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे बेनोडा (शहीद) येथील शहीद स्मृती विद्यालय परिसरात दुपारी २ वाजता होणाऱ्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर राहतील तर राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी, माजी आमदार तथा विदर्भ राज्य आंदोलन समितीचे वामनराव चटप यांची विशेष प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, तहसीलदार रामदास शेळके, बेनोडाच्या सरपंच रजनी कुबडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.



या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शहीद स्मृती शिक्षण समिती बेनोडाचे अध्यक्ष प्रा.विनय फरकाडे, उपाध्यक्ष श्रीधर सोलव, ॲड.रमाकांत फरकाडे, सचिव डॉ.नारायण फरकाडे, सदस्य रामदास कुबडे, नरेंद्र फरकाडे, दीपक फरकाडे, आनंद फरकाडे, शहीद स्मृति विद्यालय, स्वा.सं.सै.श्री.बळीरामजी फरकाडे उच्च माध्यमिक विद्यालय, श.स्मृ.उच्च माध्य.व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्राचार्य सोमेश्वर चवरे, स्वा.सं.सै.श्री.श्रावणजी फरकाडे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना श्रीखंडे यांचेसह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे

# डॉ.रंगनाथन जयंती तथा राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे ग्रंथालयशास्त्र विभागाच्या वतीने डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती तथा राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यावेळी ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे, ग्रंथपाल प्रा.माधवी घोरमाडे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.

यावेळी प्रा.विजय ठाकरे व प्रा.माधवी घोरमाडे यांनी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्रातील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी वाचन संस्कृती विकसित होणे गरजेचे असून नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व आणि ग्रंथालयाचा ज्ञानसंपादनातील उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिन समारंभ

# न.प.च्या वतीने विविध ठिकाणी मान्यवरांचे हस्ते ध्वजारोहण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वातंत्र्य भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिन समारंभ वरुड नगर परिषदेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने शहरातील विविध ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार असून अनेक वर्षांच्या विश्रांतीनंतर प्रथमच नगराध्यक्षांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालय परिसरात ध्वजारोहण करण्यात येणार आहे.



नगरपरिषद कार्यालय परिसरात सकाळी ८.२५ वाजता नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे . सकाळी ७ वाजता नगरपरिषद मराठी विद्यामंदिर क्र.२ येथील ध्वजारोहण न.प.उपाध्यक्ष कविता उपरकर यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक गौरव इंगळे व डॉ.प्रांजली कुऱ्हाडे यावेळी उपस्थित राहतील. सकाळी ७.१५ वाजता न.प.सावता विद्यामंदिर येथील ध्वजारोहण शिक्षण समिती सभापती प्राजक्ता चौधरी यांच्या हस्ते होणार असून नगरसेविक भारती माळोदे व सीमा कानुगो यावेळी उपस्थित राहतील. ७.२० वाजता सावता चौक शहीद स्मारक येथील ध्वजारोहण सार्वजनिक बांधकाम समिती सभापती जीवन मालपे यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक तथा भाजपा गटनेते किरण सावरकर व नगरसेवक योगेश्वर खासबागे यावेळी उपस्थित राहतील. ७:२५ वाजता न.प. जवाहर विद्यामंदिर येथील ध्वजारोहण पाणीपुरवठा व जलनिसारण समिती सभापती अनिता पराते यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक देवेंद्र बोडखे व तारेश देशमुख याप्रसंगी उपस्थित राहतील. ७:३० वाजता केदारेश्वर विद्या मंदिर येथील ध्वजारोहण स्वच्छता व आरोग्य समिती सभापती विनय खासबागे यांच्या हस्ते होणार असून नगरसेविका छाया दुर्गे व नगरसेवक मुन्ना तिवारी यावेळी उपस्थित राहतील. ७.३५ वाजता न.प.उर्दू प्राथमिक शाळा येथील ध्वजारोहण नगरसेवक मोहम्मद निसार यांच्या हस्ते होणार असून आलिया तबस्सुम शेख नाजीम कुरेशी यावेळी उपस्थित राहतील. ७:४० मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याजवळ ध्वजारोहण माजी सैनिक मनोज चौधरी यांच्या हस्ते व नगरसेवक गोपी अढाऊ व नगरसेविका ज्योती शेगेकर यांचे उपस्थितीत होणार आहे.७.५० वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळ्याजवळील ध्वजारोहण नियोजन व विकास समिती सभापती पुष्पा पवार यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक संदीप देवते, निलेश दुर्गे, राहुल आगरकर यांच्या उपस्थित हा कार्यक्रम होणार आहे. ७.५५ वाजता शहीद स्मारकातील ध्वजारोहण माजी सैनिक बाबाराव टेकाडे यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक देवेंद्र बोडखे व नगरसेविका मनिषा उईके या प्रसंगी उपस्थित राहतील. सकाळी ८ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळे यांचे पुतळ्याजवळ महिला व बालकल्याण समिती सभापती भाग्यश्री अधव यांचे हस्ते होणार असून नगरसेवक अन्सार बेग व नगरसेविका भारती माळोदे याप्रसंगी उपस्थित राहतील. ८.१० वाजता उर्दू प्राथमिक शाळा येथील ध्वजारोहण माजी शिक्षक निसार अली यांच्या हस्ते होणार असून नगरसेवक प्रवीण सावरकर व योगेश्वर खासबागे याप्रसंगी उपस्थित राहतील.

८.३५ वाजता विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप नगरपरिषद पदाधिकारी व सदस्यांचे हस्ते करण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## संपादकीय

**स्वतःला इतकं सक्षम बनवा की तुम्हाला कोणाच्या ओळखीची गरज पडणार नाही.**

## खड्ड्यात गेला महाराष्ट्र : विकासाच्या नावाखाली रस्त्यांची दुर्दशा

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत आणि औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्यांपैकी एक मानले जाते. मुंबईसारखी आर्थिक राजधानी, पुण्यासारखे शैक्षणिक व तंत्रज्ञानाचे केंद्र, नागपूरसारखे महत्त्वाचे शहर आणि असंख्य औद्योगिक व कृषी पट्टे महाराष्ट्राच्या विकासाची ओळख सांगतात. मात्र, या विकासाच्या चमकदार चित्रामागे अनेक ठिकाणी रस्ते, वाहतूक, पाणी, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांची दयनीय अवस्था दिसून येते. विशेषतः रस्त्यांवरील खड्डे हा महाराष्ट्राच्या विकासव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा विषय बनला आहे. पावसाळा सुरू झाला की राज्यातील अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अक्षरशः बिकट होते. कालपर्यंत व्यवस्थित दिसणारा रस्ता काही दिवसांच्या पावसानंतर खड्ड्यांनी भरून जातो. काही ठिकाणी खड्डे इतके मोठे असतात की रस्ता कुठे आहे आणि खड्डा कुठे आहे, हेच ओळखणे कठीण होते. दुचाकीस्वार, रिक्षाचालक, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे 'खड्ड्यात गेला महाराष्ट्र' ही उपरोधिक भाषा आता केवळ विनोद राहिलेली नाही; ती सामान्य नागरिकांच्या अनुभवाचे वास्तववादी चित्रण बनत चालली आहे. रस्ते बांधण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. नवीन रस्ते, डांबरीकरण, काँक्रिटीकरण, दुरुस्ती अशा विविध कामांवर सरकारी यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. तरीही रस्त्यांची गुणवत्ता काही महिन्यांतच ढासळत असेल तर या खर्चाचे नियोजन, कामाची गुणवत्ता आणि देखरेख यांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. रस्ता बांधताना दर्जेदार साहित्य वापरले जाते का? कामाचे योग्य परीक्षण होते का? संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित केली जाते का? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळणे आवश्यक आहे. खड्ड्यांचा सर्वाधिक फटका दुचाकीस्वारांना बसतो. रात्रीच्या वेळी किंवा मुसळधार पावसात खड्डे पाण्याने भरले की त्यांची खोली लक्षात येत नाही. परिणामी अपघातांचा धोका वाढतो. अनेकदा रस्त्यावरील खड्डे टाळण्याच्या प्रयत्नात वाहनांचे नियंत्रण सुटते. केवळ वाहनांचे नुकसान होत नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. एखाद्या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना अपघाताचा सामना करावा लागला, तर त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न प्रशासनाने स्वतःला विचारला पाहिजे. ग्रामीण महाराष्ट्राची परिस्थितीही वेगळी नाही. गावांना जोडणारे रस्ते खराब असल्यास शेतमाल बाजारपेठेत पोहोचवताना शेतकऱ्यांना अडचणी येतात. विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाणे कठीण होते. रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी वेळ लागतो. पावसाळ्यात अनेक गावांतील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अधिकच खराब होते. त्यामुळे रस्ता हा केवळ वाहतुकीचा मार्ग नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे, हे प्रशासनाने लक्षात घेणे गरजेचे आहे.


## आजचे राशिभविष्य


वर्तमान
मंगळवार, ३ जून २०२५
शके १९४७, ज्येष्ठ शुद्ध ७

ग्रह-नक्षत्रांच्या हालचालीवर आधारित तुमचे आजचे भविष्य.
नोकरी, व्यवसाय, आर्थिक, आरोग्य, प्रेम व कौटुंबिक जीवन कसे राहील, जाणून घ्या.

| | |
|---|---|
| मेष (चु, चे, चो, ला, ली, लु, ले, लो, अ) | आजचा दिवस चांगला जाईल. कामात यश मिळेल. नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. |
| वृषभ (ई, उ, ए, ओ, वा, वी, वु, वे, वो) | आजचा दिवस स्थिर राहील. खर्च वाढू शकतो. व्यवसायात नफा होईल. कुटुंबासोबत वेळ जाईल. आरोग्य उत्तम राहील. |
| मिथुन (का, की, कु, घु, ड, छ, के, को, ह) | आज तुम्ही वाणी प्रभावी ठराल. नोकरीत बदलाच्या संधी आहेत. प्रवास होऊ शकतो. प्रेमजीवनात गोडवा राहील. |
| कर्क (ही, हु, हे, हो, डा, डी, डु, डे, डो) | आज घरगुती कामात व्यस्त राहाल. मानसिक शांती मिळेल. मालमत्तेशी संबंधित कामे पूर्ण होतील. आरोग्याची काळजी घ्या. |
| सिंह (मा, मी, मु, मे, मो, टा, टी, टू, टे) | आजचा दिवस यशदायी आहे. मान-सन्मान वाढेल. राजकारणात लाभ होऊ शकतो. नवे उपक्रम यशस्वी ठरतील. |
| कन्या (टो, पा, पी, पू, ष, ण, ठ, पे, पो) | आज कामात लक्ष केंद्रित करा. आर्थिक लाभाचे योग आहेत. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला. आरोग्य उत्तम राहील. |
| तुला (रा, री, रू, रे, रो, ता, ती, तू, ते) | आज व्यवसायात प्रगती होईल. भागीदारीत फायदे होतील. प्रेमजीवनात आनंद मिळेल. प्रवासाचा योग आहे. |
| वृश्चिक (तो, ना, नी, नु, ने, नो, या, यी, यु) | आज धैर्याने काम करा. अडलेली कामे पूर्ण होतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. आरोग्य थोडे सांभाळा. |
| धनु (ये, यो, भा, भी, भू, धा, फा, ढा, भे) | आज भाग्याची साथ मिळेल. नोकरीत बढतीचे योग आहेत. मित्रांची मदत होईल. धार्मिक कार्यात रस वाढेल. |
| मकर (भो, जा, जी, खी, खू, खे, खो, गा, गी) | आज कामाचा ताण वाढू शकतो. संयम ठेवा. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. आरोग्याची काळजी घ्या. |
| कुंभ (गु, गे, गो, सा, सी, सू, से, सो, दा) | आज नवीन कल्पनांना वाव मिळेल. व्यवसायात यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. मान-सन्मान वाढेल. |
| मीन (दी, दु, थ, झ, ज, दे, दो, चा, ची) | आज अंतर्ज्ञानावर विश्वास ठेवा. नोकरीत यश मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. आरोग्य चांगले राहील. |

# शिस्त हरवली तर समाज ढासळतो

समाजव्यवस्थेचा पाया कायदा, शिस्त, परस्परांचा आदर आणि जबाबदारी या चार आधारस्तंभांवर उभा असतो. नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण व्हावे आणि प्रत्येकाला न्याय मिळावा यासाठी राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. मात्र जेव्हा कायद्याचा धाक कमी होतो, नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते आणि हिंसा, अफवा, स्वार्थ व बेफिकिरी यांना सामाजिक मान्यता मिळू लागते, तेव्हा अराजकतेची बीजे रोवली जातात. अशा परिस्थितीत अराजकाशी दोन हात करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य ठरते.




अराजकता म्हणजे केवळ दंगली किंवा हिंसाचार नव्हे. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, वाहतुकीचे नियम धुडकावणे, अफवा पसरवणे, कायदा हातात घेणे, भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणे, सामाजिक तेढ निर्माण करणे आणि जबाबदारीपासून पळ काढणे हीदेखील अराजकतेचीच रूपे आहेत. समाजात अशा प्रवृत्ती वाढल्या की सर्वसामान्य नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. कायद्यावरचा विश्वास कमी होतो आणि 'ज्याची ताकद त्याचा न्याय' अशी धोकादायक मानसिकता वाढीस लागते.

लोकशाहीमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे. प्रत्येक नागरिकाला आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. शासनाच्या निर्णयांवर टीका करण्याचा, आंदोलन करण्याचा आणि आपल्या मागण्या मांडण्याचा अधिकारही लोकशाहीने दिला आहे. परंतु अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव असणे तितकेच आवश्यक आहे. आंदोलन लोकशाहीचे साधन आहे; हिंसा आणि सार्वजनिक मालमत्तेची नासधूस हे लोकशाहीचे लक्षण नाही. विरोधाचा आवाज बुलंद असावा; मात्र तो कायदा आणि सामाजिक शांततेच्या चौकटीत असावा.

आज समाजमाध्यमांनी संवादाची ताकद सामान्य माणसाच्या हातात दिली आहे. ही मोठी सकारात्मक गोष्ट असली तरी त्याचा गैरवापर अराजकतेला खतपाणी घालू शकतो. एखादी अपूर्ण माहिती, जुना फोटो किंवा खोटा संदेश क्षणार्धात हजारो लोकांपर्यंत पोहोचतो. त्यातून गैरसमज, भीती आणि सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. डिजिटल युगात 'फॉरवर्ड' करण्यापेक्षा 'फॅक्ट-चेक' करणे अधिक महत्त्वाचे झाले आहे.

अराजकतेला खतपाणी घालणारा आणखी एक घटक म्हणजे कायद्याची अंमलबजावणी करताना होणारी दिरंगाई. गुन्हा घडल्यानंतर त्याची चौकशी, दोषींवर कारवाई आणि पीडितांना न्याय मिळण्याची प्रक्रिया विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. कायदा सर्वांसाठी समान आहे, हा विश्वास नागरिकांच्या मनात दृढ झाला पाहिजे. प्रभावशाली व्यक्ती असो वा सामान्य नागरिक, कायद्यापुढे सर्व समान आहेत, ही भावना लोकशाहीच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

अराजकाशी लढताना पोलिस आणि प्रशासनाची भूमिका निर्णायक असते. पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखताना संयम, निष्पक्षता आणि व्यावसायिकता जपणे आवश्यक आहे. प्रशासनानेही परिस्थिती बिघडण्याची वाट न पाहता संभाव्य तणावाच्या ठिकाणी संवाद, प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृती यांना प्राधान्य द्यावे. एखाद्या घटनेनंतर केवळ कारवाई करण्यापेक्षा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पूर्वतयारी करणे अधिक प्रभावी ठरते.

मात्र प्रत्येक प्रश्नाचे उत्तर केवळ पोलिसी कारवाईत नाही. समाजातील अस्वस्थतेची कारणे समजून घेणेही आवश्यक आहे. बेरोजगारी, गरिबी, अन्यायाची भावना, शिक्षणाचा अभाव, सामाजिक भेदभाव आणि राजकीय ध्रुवीकरण यांसारख्या अनेक कारणांमुळे तरुणांमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. हा असंतोष योग्य मार्गाने व्यक्त करण्यासाठी संवादाची दारे खुली ठेवणे गरजेचे आहे. तरुणांना शिक्षण, कौशल्य, रोजगार आणि सकारात्मक सहभागाच्या संधी मिळाल्या तर अराजकतेकडे वळण्याची शक्यता कमी होते.

राजकीय नेतृत्वाची जबाबदारीही मोठी आहे. राजकारणात मतभेद असतीलच; पण सत्तेसाठी समाजात द्वेष निर्माण करणे किंवा संवेदनशील विषयांचा राजकीय फायद्यासाठी वापर करणे टाळले पाहिजे. लोकप्रतिनिधी हे समाजाचे मार्गदर्शक असतात. त्यांच्या भाषणातून संयम, संवाद आणि लोकशाही मूल्यांचा संदेश जाणे अपेक्षित आहे. राजकीय संघर्ष असावा, पण तो वैचारिक असावा; सामाजिक संघर्षात त्याचे रूपांतर होणे कोणाच्याही हिताचे नाही.

शाळा आणि महाविद्यालयांमध्येही नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्याची गरज आहे. संविधान, कायदा, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यांची माहिती केवळ पाठ्यपुस्तकापुरती मर्यादित राहू नये. विद्यार्थ्यांना विवेकपूर्ण विचार, मतभिन्नतेचा आदर, डिजिटल साक्षरता आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण मिळाले पाहिजे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे अराजकतेविरुद्धची सर्वात प्रभावी लढाई ही शिक्षणातूनच सुरू होऊ शकते.

सामान्य नागरिकानेही आपल्या दैनंदिन वर्तनातून कायद्याचा सन्मान केला पाहिजे. वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान न करणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, चुकीची माहिती पसरवू नये आणि अन्याय दिसल्यास कायदेशीर मार्गाने आवाज उठवणेङ्घया छोट्या वाटणाऱ्या गोष्टी समाजव्यवस्था मजबूत करतात. अराजकता एका मोठ्या घटनेतूनच निर्माण होत नाही; ती छोट्या-छोट्या नियमभंगातूनही हळूहळू वाढते.

संविधानाने आपल्याला अधिकार दिले आहेत, पण त्याचबरोबर कर्तव्यांचीही आठवण करून दिली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे, पण त्याचा वापर समाजात द्वेष आणि हिंसा पसरवण्यासाठी होऊ नये. आंदोलनाचा अधिकार महत्त्वाचा आहे, पण इतर नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि सार्वजनिक जीवनाचा विचार त्यात असला पाहिजे. स्वातंत्र्याचा खरा अर्थ स्वैराचार नसून जबाबदारीसह स्वातंत्र्य हा आहे.

आज अराजकाशी दोन हात करण्यासाठी तीन गोष्टी अत्यंत आवश्यक आहेतङ्घकायद्याचे राज्य, सामाजिक संवाद आणि नागरिकांची जबाबदारी. कायद्याचे राज्य मजबूत असेल तर गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसेल. संवाद प्रभावी असेल तर गैरसमज आणि तणाव कमी होतील. नागरिक जबाबदार असतील तर अराजकतेला समाजात फारशी जागाच मिळणार नाही.

अराजकाशी लढणे म्हणजे केवळ अराजक निर्माण करणाऱ्यांना रोखणे नव्हे; तर अराजकतेला जन्म देणाऱ्या परिस्थितीवरही मात करणे होय. समाजात न्याय, समानता, संधी आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले तर असंतोषाला हिंसक रूप घेण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे प्रशासनाने कठोरतेसोबत संवेदनशीलताही ठेवली पाहिजे आणि नागरिकांनी अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवली पाहिजे.

शेवटी, कोणत्याही समाजाची खरी ताकद त्याच्या कायद्यांमध्येच नसते, तर त्या कायद्यांचा नागरिक किती स्वेच्छेने सन्मान करतात यात असते. अराजकतेला रोखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर छोटा पण ठाम निर्णय घेतला पाहिजेङ्घअफवा पसरवणार नाही, हिंसेला समर्थन देणार नाही, कायदा हातात घेणार नाही आणि अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठवू. कारण अराजकाशी दोन हात करण्याची सुरुवात सरकारपासून नव्हे, तर आपल्या स्वतःच्या जबाबदार नागरिकत्वापासून होते.

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत खाण्याच्या सवयींमध्ये मोठा बदल झाला आहे. पूर्वी घरगुती, साधे आणि पौष्टिक अन्न हेच आहाराचे प्रमुख वैशिष्ट्य होते. मात्र आता फास्ट फूड, पॅकेज्ड पदार्थ, तळलेले पदार्थ, अतिगोड पेये, चटपटीत स्नॅक्स आणि बाहेरचे खाद्यपदार्थ यांचे आकर्षण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. जिभेला चव देणाऱ्या पदार्थांच्या मोहात आपण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत आहोत. क्षणिक चव मिळते; मात्र त्याची किंमत शरीराला दीर्घकाळ मोजावी लागू शकते. 'चविष्ट' म्हणजे 'आरोग्यदायी' असे समीकरण नाही. अनेक पदार्थ चवीला आकर्षक असतात, पण त्यात मीठ, साखर, तेल आणि प्रक्रिया केलेले घटक मोठ्या प्रमाणात असू शकतात. अशा पदार्थांचे वारंवार सेवन केल्यास संतुलित आहाराचा बिघाड होतो. शरीराला आवश्यक असलेली प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे आणि तंतुमय पदार्थ पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. त्यामुळे केवळ पोट भरणे आणि शरीराचे पोषण होणे यातला फरक समजून घेणे गरजेचे आहे. आजच्या तरुण पिढीवर फास्ट फूडचे आकर्षण विशेषतः दिसून येते. पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राइज, नूडल्स, विविध प्रकारचे तळलेले पदार्थ आणि गोड पेये यांची जाहिरात आकर्षक पद्धतीने केली जाते. सोशल मीडियावरील खाद्यपदार्थांचे व्हिडिओ आणि जाहिरातीही या आकर्षणाला अधिक वाढवतात. मित्रमैत्रिणींसोबत बाहेर खाणे हा आनंदाचा भाग बनला आहे. बाहेर खाण्यात गैर काही नाही; मात्र त्याचे प्रमाण आणि वारंवारिता नियंत्रणात ठेवणे महत्त्वाचे आहे.




आपल्या आहारात घरगुती पदार्थांचे महत्त्व कमी होत चालले आहे. भाकरी, पोळी, भाजी, डाळ, कडधान्ये, भात, कोशिंबीर, फळे, दूध आणि इतर पारंपरिक पदार्थ शरीराला आवश्यक पोषण देतात. मात्र वेळेअभावी किंवा चवीच्या आकर्षणामुळे या पदार्थांऐवजी तयार खाद्यपदार्थांना प्राधान्य दिले जाते. परिणामी आहारातील विविधता कमी होते आणि शरीराच्या गरजा पूर्ण होण्यास अडथळा निर्माण होतो.

अस्वास्थ्यकर आहाराचा परिणाम केवळ शरीरावर होत नाही, तर दैनंदिन जीवनावरही होतो. योग्य पोषण न मिळाल्यास थकवा जाणवू शकतो, एकाग्रतेवर परिणाम होऊ शकतो आणि काम करण्याची क्षमता कमी होऊ शकते. दीर्घकाळ असंतुलित आहार आणि निष्क्रिय जीवनशैली राहिल्यास वजनाशी संबंधित समस्या, रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे आरोग्याची काळजी आजपासूनच घेणे आवश्यक आहे.

विशेषतः लहान मुलांच्या आणि किशोरवयीन मुलांच्या आहाराकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. वाढीच्या काळात शरीराला विविध पोषक घटकांची आवश्यकता असते. या वयात सतत चिप्स, पॅकेज्ड स्नॅक्स, गोड पेये किंवा तळलेले पदार्थ खाण्याची सवय लागल्यास पौष्टिक पदार्थांबद्दलची आवड कमी होऊ शकते. त्यामुळे मुलांना केवळ 'हे खाऊ नकोस' असे सांगण्याऐवजी पौष्टिक आणि चविष्ट पर्याय उपलब्ध करून देणे अधिक प्रभावी ठरते. खाद्यपदार्थांच्या जाहिरातींचाही या समस्येत मोठा वाटा आहे. आकर्षक रंग, प्रसिद्ध व्यक्ती, विशेष ऑफर्स आणि मनाला भुरळ घालणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून ग्राहकांना पदार्थांकडे आकर्षित केले जाते. मात्र जाहिरातीत दिसणारे आकर्षक चित्र आणि त्या पदार्थाचे पोषणमूल्य यांचा संबंध असेलच असे नाही. त्यामुळे ग्राहकांनी जाहिरातीपेक्षा पदार्थातील घटक आणि त्याचे पोषणमूल्य समजून घेण्याची सवय लावली पाहिजे. यासाठी अन्नपदार्थांचे लेबल वाचणे ही चांगली सवय आहे. पॅकेज्ड पदार्थ घेताना त्यातील साखर, मीठ, चरबी आणि इतर घटकांचे प्रमाण तपासणे आवश्यक आहे. 'हेल्दी', 'नॅचरल' किंवा 'फिटनेस' अशा आकर्षक शब्दांवरच विश्वास न ठेवता संपूर्ण माहिती वाचणे महत्त्वाचे आहे. जागरूक ग्राहक हा केवळ स्वतःच्या आरोग्याचे रक्षण करत नाही, तर बाजारपेठेलाही चांगल्या गुणवत्तेचे पदार्थ देण्यास भाग पाडतो. आरोग्यदायी आहार म्हणजे चव नसलेले अन्न, असा गैरसमजही दूर झाला पाहिजे. घरच्या घरी कमी तेल, योग्य प्रमाणातील मीठ आणि साखर वापरून अनेक चविष्ट पदार्थ तयार करता येतात.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ५ वर्षात ३६ हजार कंपन्या बंद, शरद पवारांच्या टीकेला फडणवीसांचे उत्तर





(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – चाकण औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांच्या प्रश्नावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. वाहतूक कोंडी, खराब रस्ते, वीज समस्या, पाणी आणि इतर सुविधांच्या अभावामुळे चाकण एमआयडीसीतील तब्बल २० कंपन्यांनी खंडाळा एमआयडीसीकडे स्थलांतर करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान खासदार राजाभाऊ वाजे यांनी राज्याच्या औद्योगिक धोरणासंबंधी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री हर्ष मल्होत्रा यांनी गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्रातील तब्बल ३६,२११ खासगी कंपन्या बंद झाल्याची माहिती दिली होती. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारवर टीका केली होती.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्या ट्विटला उत्तर देत महाराष्ट्रातील कंपन्यांच्या आकडेवारीबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे की, शरद पवार साहेब, संसदेतील खा. राजाभाऊ वाजे यांच्या एका प्रश्नाच्या उत्तरात काही माहिती केंद्र सरकारकडून देण्यात आली. राज्यातील ३६,२११ कंपन्या बंद झाल्या वगैरे... काही नवख्या नेत्यांनी त्यासंदर्भात सोयीचा अर्थ काढून समाजमाध्यमांवर पोस्ट केल्या आणि काही माध्यमांनी त्याच्या बातम्या केल्या. पण, आपण कायम महाराष्ट्रहिताचा विचार करणारे सुजाण आणि ज्येष्ठ नेते आहात, त्यामुळे आपल्या मनात कोणता गैरसमज राहू नये, म्हणून हा थोडा विस्ताराने लेखनप्रपंच! बंद झालेल्या ७६ टक्के कंपन्या डिफफंक्ट मुळात एक लक्षात घेतले पाहिजे, ज्या कंपन्या बंद होतात, त्यातील ७६ टक्के या डिफफंक्ट कंपनी असतात.

## शिवसेना आमदारांच्या पात्रता

# अपात्रता प्रकरणी शाश्वत निर्णय दिल्याचा नार्वेकरांचा दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – 'विधानसभा अध्यक्ष म्हणून आमदार अपात्रतेच्या याचिकेवर निर्णय घेणे ही माझी घटनात्मक जबाबदारी होती. या प्रकरणात १० व्या परिशिष्टातील तरतुदी आणि 'डिसक्वालिफिकेशन ऑफ मेंबर ऑन ग्राउंड रुल १९८६'मधील सर्व कायदेशीर नियमांचे तंतोतंत पालन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या निकषांच्या आधारेच हा निर्णय देण्यात आला असून, तो पूर्णपणे शाश्वत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात माझा निकाल निश्चितपणे टिकून राहील,' असा विश्वास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला. सर्वोच्च न्यायालयात सध्या शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हाबाबत तसेच आमदार अपात्रतेच्या मुद्द्यावर सुनावणी सुरू आहे. उबाठा गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर न्यायालयात आक्षेप नोंदवला होता. या पार्श्वभूमीवर राहुल नार्वेकर यांनी आपली बाजू स्पष्ट केली. ते म्हणाले की, हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असले, तरी पिठासीन अधिकारी म्हणून मी माझे काम अत्यंत चोख बजावले आहे. सर्वोच्च न्यायालय हे देशातील सर्वोच्च व्यासपीठ असून, न्यायालय जो काही अंतिम निर्णय देईल, तो सर्वांनी सन्मानाने स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे. आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्यांवरून विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नार्वेकर म्हणाले की, लोकप्रतिनिधींनी जनतेमध्ये जाऊन काम करणे ही त्यांची जबाबदारीच आहे. फिरून कुणी कुणावरही उपकार करत नाही. स्थानिक आमदारांनी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत राहिलेच पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# घर कोसळण्याच्या दुर्घटनेत ७६ जणांचा मृत्यू

## ३३९ जण जखमी, साडेपाच वर्षांत १,१७५ घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – दरवर्षी पावसाळ्यात घरे किंवा घरांचा भाग कोसळण्याच्या दुर्घटना घडतात. जानेवारी २०२१ ते जुलै २०२६ पर्यंत घर कोसळण्याच्या तब्बल १,१७५ दुर्घटना घडल्या असून साडेपाच वर्षांत ७६ जणांचा मृत्यू झाला, तर ३३९ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, २०२६ च्या सात महिन्यात घर कोसळण्याच्या तब्बल ६०९ घटना घडल्या असून ८ जण दगावले, तर २७ जण जखमी झाल्याची माहिती आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज यंदा ५ जुलै रोजी मुंबईतील मानखुर्द परिसरात मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर इमारतीचा भाग कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला होता. पावसाळ्यात जुन्या इमारती, झोपड्या आणि कमकुवत बांधकामांना धोका वाढत आहे. त्यामुळे याकडे प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी गंभीर इशारा म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

दरड कोसळण्याच्या घटना, २०२१ ते ७ जुलै २०२६, एकूण घटना : ९५, जखमी : २१, मृत्यू : ३१.

# मुंबई-महाराष्ट्रातील दूरसंचार क्षेत्राचा बदलला चेहरा

## दशकपूर्तीला जिओचे ५.७९ कोटी ग्राहक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – दहा वर्षांपूर्वी, सप्टेंबर २०१६ मध्ये रिलायन्स जिओने मुंबई आणि महाराष्ट्रातील दूरसंचार क्षेत्रात प्रवेश केला. शून्य ग्राहकसंख्येपासून सुरुवात करत जिओने पहिल्याच महिन्यात दोन्ही सर्कलमध्ये १५.५ लाख ग्राहक जोडले. जून २०२६ पर्यंत जिओचा ग्राहकवर्ग ५.७९ कोटींवर पोहोचला.

सप्टेंबर २०१६ मधील सुरुवातीच्या १५.५ लाख ग्राहकांपासून जून २०२६ मधील ५.७९ कोटी ग्राहकांपर्यंत जिओचा ग्राहकवर्ग ४५ टक्के चक्रवाढ वार्षिक वाढ दराने वाढला आहे. मुंबई-महाराष्ट्रातील एकत्रित वायरलेस ग्राहक बाजारपेठेत जिओचा वाटा ४० टक्के आहे.

जिओने सुरुवातीपासूनच ४जी आणि ऑल-आयपी नेटवर्कसह बाजारात प्रवेश केला. परवडणारा डेटा आणि मोफत आऊटगोइंग कॉल्समुळे तत्कालीन टॅरिफ रचनेला मोठे आव्हान निर्माण झाले आणि मोबाइल सेवांच्या अर्थकारणातच बदल झाला. जिओच्या ४जी व्होल्ट आधारित नेटवर्कमुळे आणि मोफत कॉलिंगमुळे ग्राहकांसाठी मोबाइल सेवांचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला. जिओच्या वाढीचा परिणाम उर्वरित बाजारपेठेच्या तुलनेत अधिक स्पष्टपणे दिसून येतो. जिओपूर्वी ऑगस्ट २०१६ मध्ये मुंबई आणि महाराष्ट्रात मिळून ११.५२ कोटी वायरलेस ग्राहक होते. हे सर्व ग्राहक तत्कालीन विद्यमान ऑपरेटर्सकडे होते. जून २०२६ पर्यंत एकूण बाजारपेठ वाढून १४.४७ कोटी ग्राहकांवर पोहोचली.

यापैकी एकट्या जिओकडे ५.७९ कोटी कनेक्शन्स आहेत. इतर सर्व ऑपरेटर्सचा एकत्रित ग्राहकवर्ग सध्या ८.६७ कोटी आहे.

# बनावट नोटांचा कारखाना उद्ध्वस्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – नाशिकमध्ये बनावट नोटा छापण्याचा सुरू असलेला मोठा अड्डाच पोलिसांनी उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईत लाखो रुपयांच्या बनावट नोटांसह नोटा छापण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि उपकरणे जप्त करण्यात आली असून, या प्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

नाशिक ग्रामीण आणि नाशिक शहर पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. त्र्यंबकेश्वर तालुक्यात तळेगाव येथील एका बंगल्यात बनावट भारतीय चलनी नोटा छापण्याचे काम सुरू असल्याचे उघडकीस आले.

या कारवाईत पोलिसांनी पाच संशयितांना अटक केली आहे. बनावट नोटा छापण्याच्या या रॅकेटमध्ये प्रत्येक आरोपीची नेमकी भूमिका काय होती, याचा तपास सुरू आहे. तसेच हा अड्डा किती दिवसांपासून सुरू होता, आतापर्यंत किती नोटा छापण्यात आल्या आणि त्या बाजारात चलनात आणल्या गेल्या आहेत का, याचाही तपास केला जात आहे.

बनावट नोटा तयार केल्यानंतर त्या नाशिक शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत अथवा इतर जिल्ह्यांत चलनात आणल्या गेल्या आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत. आरोपींच्या चौकशीतून या रॅकेटच्या वितरण साखळीची माहिती मिळण्याची शक्यता आहे.तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी लागणारे कागद, छपाईची साधने आणि इतर साहित्य आरोपींना कोठून मिळाले, याचाही तपास सुरू आहे.

# भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** –भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राजनैतिक अधिकारी, वाणिज्यदूत, विविध देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांचे स्वागत केले. भारताची प्रगती, महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि भविष्यातील विकासदृष्टी यांचा यावेळी त्यांनी आढावा घेतला. मुख्यमंत्री यांच्या पत्नी अमृता फडणवीस, विविध देशांचे महावाणिज्य दूत, कौन्सुलर कॉर्प्सचे डीन आणि पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, राज्यमंत्री योगेश कदम, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून समावेशकता, सहिष्णुता आणि विविध विचारांचा स्वीकार ही देशाची वैशिष्ट्ये आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा देश म्हणून उदयास येत आहे.

जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्थान प्राप्त केले असून लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सपेक्षा मोठ्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# राष्ट्रीय अर्थसहाय्य योजनेचे अनुदान तातडीने द्या

## ज्ञानेश्वर यावले यांची विभागीय आयुक्तांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – राष्ट्रीय अर्थसहाय्य योजनेचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी उदापुर येथील ज्ञानेश्वर यावले यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेली राष्ट्रीय कुटूंब योजना वरुड तालक्यातच गेल्या ३ वर्षापासून लाभार्थी तहसिल कार्यालयात अनुदानासाठी अर्ज सादर केला असता आजपर्यंत लाभ मिळालेला नाही. जे कुटूंब बि.पी.एल. धारक आहे, त्या कुटूंबातील व्यक्ती मरण पावल्यास त्याच्या पत्नीला २० हजार रुपयांची मदत मिळते. याबाबत जिल्हाधिकारी यांना लेखी स्वरुपात २६ जुन २०२५ व २४ फेब्रुवारी २०२६ माहीती देण्यात आली परंतु एक वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा अनुदान मिळाले नाही. येत्या ७ दिवसाच्या आत तोडगा न निघाल्यास वरुड तहसिल कार्यालयात जवळ आमरण उपोषण करण्याचा ईशारा दिला असून शाासनाने सन २०२४ मध्ये मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात आली असता जेष्ठ नागरिक ६५ वर्षांवरील नागरिकांनी पंचायत समिती स्तरावर अर्ज केले असता वरील योजना सामाजिक न्याय विभाग कार्यरत केला होता. २ वर्षांपासुन जेष्ठ नागरिकांना ३ हजार रुपये मिळणार, या आशेवर असतांना अद्याप मदत मिळाली नाही, या योजनेची चौकशी करुन प्रकरण निकाली काढून जेष्ठ नागरिकांना मदत करावी, अशी मागणी सुध्दा ज्ञानेश्वर यावले यांनी केली आहे.

## अनु.जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झालेल्या

# माजी सरपंच मनोज पेलागडे यांना अटकपुर्व जामीन मंजुर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – जामगांव (खडका) येथील माजी सरपंच मनोज पेलागडे यांचेवर सरपंच यांचे तक्रारीवरुन बेनोडा पोलिसांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या अन्वये गुन्हा दाखल केला होता, वरुड येथील जिल्हा न्यायालयाने त्यांचा अटकपुर्व जामीन सुध्दा फेटाळला होता. या निर्णयाविरुध्द त्यांनी उच्च् न्यायालयात धाव घेतली होती अखेर न्यायालयाने त्यांना जामीन मंजुर केला आहे. याकरीता ॲड.आर.ए.बागडे, ॲड.एम.जी.काठीवाला, ॲड.एन.ए.नांदणे यांनी न्यायालयात आरोपीच्या वतीने बाजु मांडली.

जामगांव (खडका) येथील माजी सरपंच मनोज पेलागडे यांनी वरुड येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांनी अटकपुर्व जामीन नाकारल्याविरुध्द अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या भाग १४-अ अंतर्गत उच्च न्यायालयामध्ये फौजदारी अपील दाखल केली होती. सदरचा गुन्हा बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशनमध्ये बीएनएस भाग २९६ आणि एससी/एसटी कायद्याच्या ३ (१), (आर) (एस) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उच्च न्यायालयाचे सर्वात महत्वाचे निरिक्षण असे आढळुन आले की, प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नुसार आरोपीने ग्रामपंचायत कार्यालयात चेक फाडुन तक्रारदाराच्या अंगावर फेकला आणि अपशब्द असल्याचे दिसत नाहीत त्यामुळे प्रथमदर्शनी कायद्याचे कलम ३ (१), (आर) (एस) च्या गुन्हयाचे आवश्यकश साहित्य पुर्ण होत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

शेवटी १३ मार्च २०२६ चा वरुड येथील जिल्हा न्यायाधिश यांचा जामीन फेटाळण्याचा आदेश रदद करण्यात आला आणि अपील मान्य करण्यात आली. आरोपीच्या वतीने ॲड.आर.ए.बागडे, ॲड.एम.जी.काठीवाला, ॲड.एन.ए.नांदणे यांनी प्रयत्न केले.

# राज्यात १ सप्टेंबरपासून 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत'

## महसूलमंत्र्यांची घोषणा : पुणे पॅटर्नच्या यशांनंतर राज्यव्यापी अंमलबजावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील मंडळ अधिकाऱ्यांपासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंतच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये वर्षांनुवर्षे रेंगाळलेल्या जमिनीच्या महसुली दाव्यांचा त्वरित आणि कायमस्वरूपी निपटारा करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. क्रान्तिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून राज्यात १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबवण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली. महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या न्यायालयात जमिनींशी संबंधित हजारो दावे प्रलंबित आहेत. एखाद्या प्रकरणात निकाल लागला तरी असंतुष्ट पक्षकार वरिष्ठ न्यायालयात पुन्हा अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात. यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाया जातो आणि प्रशासनावरील ताण वाढतो. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आलेल्या 'महसूल लोक अदालत' उपक्रमाला मोठे यश मिळाले होते. त्यामुळे पुणे पॅटर्नच्या धर्तीवर आता संपूर्ण महाराष्ट्रात ही मोहीम राबवली जाणार आहे.

# अमेरिकेने गमावला ड्रोन ताफ्याचा चतुर्थांश भाग

## ४५ 'एमक्यू-९ रीपर' नष्ट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षामुळे अमेरिकेच्या लष्कराला मोठे आर्थिक आणि सामरिक नुकसान सहन करावे लागत आहे.

'वॉशिंग्टन पोस्ट'च्या वृत्तानुसार, या युद्धात अमेरिकेने आपले किमान ४५ महागडे एमक्यू-९ रीपर ड्रोन



गमावले आहेत. ही संख्या अमेरिकेच्या एकूण ड्रोन ताफ्याच्या सुमारे एक चतुर्थांश आहे. या विध्वंसामुळे अमेरिकेचे अंदाजे १.३ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिकचे नुकसान झाले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ विनाशाचा सामना एमक्यू-९ रीपर हा अत्यंत आधुनिक आणि पाळत ठेवण्यासह अचूक हल्ले करणारा पाश्चात्त्य बनावटीचा ड्रोन आहे. सेन्सर्स आणि शस्त्रास्त्रांनुसार एका ड्रोनची किंमत ३० ते ५० दशलक्ष डॉलर्स दरम्यान असते.

सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ या ड्रोनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. मात्र, हे ड्रोन संथ गतीने आणि अनेकदा कमी उंचीवर उडत असल्यामुळे इराण आणि त्याच्या मित्र राष्ट्रांसाठी ते सोपे लक्ष्य ठरले आहेत.

# 'पार्ले ॲग्रो'च्या गोदामांवर 'एफडीए'ची धाड, मुदत संपलेली उत्पादने जप्त

## फ्रुटी आणि 'ॲपे फिज'चा समावेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबईतील चेंबूर परिसरात 'पार्ले ॲग्रो' कंपनीच्या गोदामावर अचानक धाड टाकून, मुदत संपलेल्या (एक्सपायरी डेट) फ्रुटी, ॲपे फिज, कोल्ड ड्रिंक्स आणि कॅन्डी ज्यूसचा १ लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त केला आहे. चेंबूर येथील वाशीनाका परिसरातील एल. यु. गडकरी मार्गावरील प्रयाग नगरमधील गोदामावर ही कारवाई करण्यात आली. एफडीएच्या आठ




अधिकाऱ्यांच्या पथकाने १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू केलेले हे शोधकार्य १४ ऑगस्टच्या पहाटे ५ वाजेपर्यंत सलग ११ तास सुरू होते. तपासणीदरम्यान मुदत संपलेल्या उत्पादनांचा मोठा साठा आढळून आल्यानंतर एफडीएच्या अधिकाऱ्यांनी संबंधित गोदाम सील केले आहे. याशिवाय मालाची वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी दोन वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. एफडीएचे पुढील आदेश येईपर्यंत या गोदामातून कोणत्याही अन्नपदार्थाची विक्री किंवा वाहतूक करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. राज्यात अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या निकषांचे उल्लंघन करणाऱ्या खाद्यपदार्थ निर्मिती संस्था आणि हॉटेल्सवर एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत १२ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध 'डोमिनोज पिझ्झा' चालवणाऱ्या जुबिलेंट फूडवर्क्स लि.च्या चार आऊटलेट्सचे खाद्य व्यवसाय परवाने निलंबित करण्यात आले आहेत. यामध्ये मुंबईतील विलेपार्ले (पश्चिम), बोरीवली (पश्चिम) आणि घाटकोपरच्या आर-सिटी मॉल मधील तीन, तर सातारा जिल्ह्यातील एका आऊटलेटचा समावेश आहे. तपासणीदरम्यान या आऊटलेट्समध्ये एफएसएसएआय परवाना न दर्शवणे, पिण्याच्या पाण्याची अनुपलब्धता, अन्न साठवणुकीतील त्रुटी, कीटक नियंत्रणाचा (पेस्ट कंट्रोल) अभाव आणि स्वच्छतेच्या मानकांचे उल्लंघन आढळून आले होते. बोरीवली येथील आऊटलेटमध्ये १५ टक्के नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आले. या सर्व आऊटलेट्सना कच्चे व शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे, शाकाहारी व मांसाहारी पदार्थांमध्ये फरक ठेवणे, फ्रीझरचे तापमान नियंत्रित ठेवणे आणि उपकरणांची नियमित स्वच्छता करण्याचे निर्देश एफडीएकडून देण्यात आले आहेत.

# चाकण एमआयडीसीतील समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – चाकण एमआयडीसीतील रस्ते, वाहतूक कोंडी आणि इतर पायाभूत सुविधा संबंधी अडचणी प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली व उद्योजकांना आश्वस्त केले आहे. यासाठी चाकण येथील उद्योजक, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज चाकण नागरी कृती समिती व औद्योगिक



संघटनांचे प्रतिनिधी धनंजय शेडबाळे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. यावेळी उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्याबाबत त्यांना आश्वस्त केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपमुख्यमंत्र्यांनी एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी,पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी,पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौंडे आणि चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी अंकुश जाधव यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. लवकरच सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन या समस्यांवर मार्ग काढण्यात येईल,असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.

# जमीन खरेदी-विक्री व्यवहारात शेतकरी दाखल्यांची पडताळणी बंधनकारक : सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांचे फेरआदे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शेतजमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात बनावट किंवा अवैध 'शेतकरी दाखले' सादर करून होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी महत्त्वाचे फेरआदेश जारी केले आहेत. यापुढे शेतजमिनीच्या दस्त नोंदणीपूर्वी खरेदीदाराचा शेतकरी दाखला प्रत्यक्ष पडताळून पाहणे दुय्यम निबंधक आणि संबंधित महसूल अधिकाऱ्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ६३ नुसार बिगर शेतकरी व्यक्तीला शेतजमीन खरेदी किंवा हस्तांतरित करण्यावर निर्बंध आहेत. त्यामुळे खरेदीदार शेतकरी असल्याचे सिद्ध करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला शेतकरी दाखला सादर करणे आवश्यक आहे. मात्र, सिंधुदुर्ग जिल्ह्यात बनावट किंवा अवैध दाखल्यांच्या आधारे जमीन व्यवहार होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. वेंगुर्ला तालुक्यातील दाभोली येथील काही जमीन व्यवहारांमध्ये प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय आणि सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल आठ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देऊनही विलंब झाल्याची बाब समोर आल्यानंतर जिल्हा प्रशासनाने स्वतंत्र चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करून अहवाल तयार केल्याचे समजते.


### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैनदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४३/२०२६** **ने.ता.०७/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) वच्छला गंगाधर सुपले, वय अं.७० वर्ष, धंदा-घरकाम, २) सुधिर गंगाधर सुपले, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, ३) छाया प्रदिप सुपले, वय अं.४४ वर्ष, धंदा- घरकाम, ४) मंगेश प्रदिप सुपले, वय अं.२६ वर्ष, धंदा- शेती, ५) वैशाली दिनेशराव सुपले, वय अं.४४ वर्ष, धंदा- घरकाम, ६) रिता आशिष भोंडेकर, वय अं.२१ वर्ष, धंदा- घरकाम, ७) अंकित देवेंद्रराव सुपले, वय अं.२८ वर्ष, धंदा- शेती, ८) कृनाल देवंद्रराव सुपले, वय अं.२६ वर्ष, धंदा- शेती, अर्जदार क्र.१ जे ५ व ७ ८ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.६ रा.पुसला, ता.वरुड

**... विरुध्द ...** **कोणी नाही:-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत गंगाधर बापुराव सुपले, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६८३/२०२६** **ने.ता.१७/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) राजेंद्र महादेव वहेकर, वय अं.५५ वर्ष, धंदा-मजुरी
२) प्रियांशु राजेंद्र वहेकर, वय अं.२४ वर्ष, धंदा- शिक्षण
क्र.१ व २ रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत माधुरी राजेंद्र वहेकर, रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३५०/२०२६** **ने.ता.१७/०९/२०२६**

**अर्जदार :-** सुनंदा प्रभाकर पाटील, वय अं.६४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.दुर्गवाडा, पो.तारासावंगा, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत शेगोबाई उकंडराव कठाणे, रा.वघाड, ता.वरुड, जि.अमरावती यांचे** १) चंद्रभान उकंडराव कठाणे, वय अं.७३ वर्ष, २) सुरेश उकंडराव कठाणे, वय अं.७० वर्ष, ३) बाबाराव उकंडराव कठाणे, वय अं.६८ वर्ष, ४) अर्जदार, ५) गौतम उकंडराव कठाणे, वय अं.६१ वर्ष, ६) राहुल बाबाराव पाटील, वय अं.४० वर्ष, ७) राजेश बाबाराव पाटील, वय अं.३८ वर्ष, यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१२/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६८/२०२६** **ने.ता.०९/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती समित्रा नागोराव बासंदे, वय अं.७८ वर्ष, धंदा-गृहिणी, २) अशोक नागोराव बासंदे, वय अं.६२ वर्ष, धंदा- मजुरी, ३) धनराज नागोराव बासंदे, वय अं.६० वर्ष, धंदा- मजुरी, ४) रामकृष्ण नागोराव बासंदे, वय अं.४७ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ४ रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती, ५) शशिकला अजाबराव कुकडे, वय अं.५३ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.मालखेड, पो.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत नागोराव संतुजी बासंदे, रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




### पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांचे हस्ते

# जिल्हयात वरुडचा पोलिस स्टेशनचा बेस्ट म्हणुन गौरव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण पोलीस दलातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना उत्कृष्ठ कामगीरीबद्दल त्यांचा गौरव करुन त्यांना प्रशस्तीपत्र देवुन त्यांचे मनोबल वाढविणे याबाबत संकल्पना केलेली आहे.

त्या अनुषंगाने वरुडचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी माहे जुलै २०२६ मध्ये पोलिस स्टेशनचे कामकाज उत्कृष्ठ केल्याने त्यांना बेस्ट पोलीस स्टेशन म्हणुन गौरवचिन्ह व प्रशस्ती पत्र देवुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच पोलीस स्टेशन मोर्शी अंतर्गत कलम १०३ (१), १४० (१), २३८, ३२४ (५), ३ (५) बीएनएसमध्ये तांत्रिक पुराव्याचे विश्लेषन करुन गुन्हा उघडकीस आणण्यात आला तसेच पोलिस स्टेशन खोलापुर कलम १०३ (१) बिएनएस यामध्ये पोलीस स्टेशन मोर्शी व पोलीस स्टेशन खोलापूर येथील अधिकारी व अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे शाखा अमरावती येथील अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. याबद्दल त्यांना प्रशस्ती पत्र देण्यात आले. तसेच स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पो.स्टे. लोणी येथे कलम ३०९, ३ (५) बिएनएस मधील गुन्हयातील दुचाकीस्वारात लुटणारे ५ आरोपी निश्चित करुन ३ आरोपी यांना अटक करुन एक विधीसंघर्षीत बालक याला ताब्यात घेतले व पोलिस स्टेशन लोणी हद्दीत अंमली पदार्थ गांजा छापा कारवाई करुन २० किलो ८५९ किलोग्रॅम गांजा आरोपी कडून जप्त केला.

अमरावती ग्रामीण पोलीस दलातील विविध पोलीस स्टेशन व शाखांमध्ये कार्यरत अधिकारी व अंमलदार यांनी जुलै २०२६ महिन्यात उल्लेखनिय कामगीरी करुन गुन्हे निर्गती, मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे, समन्स वॉरंट तामील करणे अंमली पदार्थ विरुध्द कार्यवाही तसेच बचाव पथकाद्वारे पुरग्रस्त नागरीकांचे प्राण वाचविणे तसेच महिला विरुध्दचे गुन्हयात २४ तासात तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले. सिसिटीएनएस मध्ये पुर्णता गुन्हयाची फिडींग करण्यात आली.



खुन व दरोडा सारखे गंभिर गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणण्यात आला तसेच प्रभावी पैरवी केल्याने न्यायालयाने गंभिर गुन्हयात आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

अवैध गांजा विक्री करणारे यांचेवर धाड टाकून मोठया प्रमाणात गांजा जप्त करण्यात येवुन आरोपीस अटक करण्यात आली. मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन मोटर सायकल जप्त करण्यात आली. हरविलेल्या मुलींचा शोध घेवुन त्यांना कुटूंबियांच्या स्वाधीन करण्यात आले. यासारखी उल्लेखनिय कार्य केले आहे.

अमरावती ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या या उल्लेखनिय कामगीरीबद्दल पोलीस अधीक्षक निकेतन कदम तसेच अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवार यांनी गुन्हे सभेच्या वेळी सर्वांचे अभिनंदन त्यांना प्रशस्तीपत्र देवुन त्यांचा गौरव करुन भविष्यातही अशाचप्रकारे कर्तव्यदक्षेने काम करण्याचे आवाहन केले आहे.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# अल्पवयीन मुलांना कट्टरपंथी बनवण्याचा प्रयत्न

### एटीएस कडून आंतरराज्यीय नेटवर्कचा पर्दाफाश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या एका कट्टरपंथी संघटनेचा हैदराबादस्थित 'दरसगाह-जिहाद-ओ-शहादत' (डीजेएस) शी संबंधित व्यक्तींशी असलेला आंतरराज्यीय नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे.




अल्पवयीन मुलांमध्ये कट्टरपंथी विचारसरणी रुजवून त्यांची एक गुप्त 'बाल' शाखा तयार करण्याच्या प्रयत्नाचा तपास अधिकारी करत आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार, तपासादरम्यान महाराष्ट्रातील संशयित आणि हैदराबादच्या डीजेएसशी संबंधित व्यक्तींमधील कार्यात्मक, आर्थिक आणि लॉजिस्टिक संबंध निष्पन्न झाले आहेत. या तपासाचे धागेधोरे अहिल्यानगर आणि यवतमाळ परिसरातील पुसद, पारडी आणि उमरखेड येथील संशयितांपर्यंत पोहोचले आहेत.

अधिकारी सध्या संवाद नोंदी, आर्थिक व्यवहार, प्रवासाचा तपशील आणि इतर पुराव्यांची तपासणी करत आहेत.

# युवतीचा विनयभंग : शहापुर येथील युवकाविरुध्द गुन्हा


### पोक्सोसह विनयभंगाच्या गुन्हयाचा समावेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – युवतीच्या विनयभंग प्रकरणी शहापुर येथील ३२ वर्षीय ईसमाविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी महिला व आरोपी हे विजातीय असुन वेगवेगळ्या जाती धर्माचे आहेत. घटनेच्या ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी तिचे घराचे समोर बॅटमिंटन खेळत होती.

आरोपी नाजीमुददीन काझी हा बरेच दिवसांपासुन तिचा पाठलाग करीत होता. तिच्या जवळ जावुन तिचा विनयभंग केला. फिर्यादीच्या मुलीने याबाबत तिचे आई वडीलांना सांगितले तेव्हा तिचे वडीलांनी आरोपीस 'तु या ठिकाणी का बरं आला?' असे म्हटले तर त्यांना फायटरने तोंडावर मारहाण केलीफ फिर्यादी ही मातंग समाजाची असल्याचे माहीत असुन सुध्दा तिचा विनयभंग करून तिचे वडीलांना



मारठोक केली. शिवीगाळ करून पाहुन घेतो, अशी धमकी दिली.

या प्रकरणी सदर ३२ वर्षीय महिलेच्या फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी नाजीमुददीन काझी जमीलउददीन काझी (३२) रा.शहापुर याचे विरुध्द कलम कलम ११८(१), ३५२, ३५१ (२) बीएनएस आर/डब्ल्यु १२ -पोक्सो आर/डब्ल्य ३(१) (डब्ल्यु) (ळ) (ळळ) ३, (२) (व्हीए) अनुसुचित जाती जमाती कायद्यावन्ये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

### पुण्याच्या चाकण एमआयडीसी तील रस्त्यांच्या दुरवस्थेचे आणखी दोन बळी

# चिखलामुळे बाईक स्लीप होऊन कंटेनरच्या चाकाखाली आली, दोघांचा जागीच दुर्दैवी अंत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – राज्यात रस्त्यांवरील खड्डयांचा मुद्दा दिवसागणिक अधिक गंभीर आणि सर्वसामान्यांच्या नाहक बळी घेण्यासाठी कारणीभूत ठरत असल्याचे समोर आलं आहे. अशातच पुणे-नाशिक




महामार्ग आणि चाकण एमआयडीसी हद्दीतील मार्गावर आणखी एक भाषण अपघाताची घटना घडली आहे. तळेगाव-चाकण महामार्गावर दुचाकीस्वार अवजड वाहनाच्या चाकाखाली आल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पावसामुळे रस्त्यावर चिखल झाला असताना आणि कंटेनर ओव्हरटेक करताना गाडी स्लीप झाली. त्याचवेळी मागून येणाऱ्या अवजड वाहनाच्या मागच्या चाकाखाली येऊन या दोघांचा दुर्दैवी अंत झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या महिन्या भरातला हा सहावा बळी ठरला माहिती आहे. त्यामुळे आणखी किती बळी गेल्यावर प्रशासन या रस्त्यांच्या दुरावस्थेकडे लक्ष देणार? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

